# “Multidisciplinary Approach towards Indian Knowledge System”

## Recent Trends in Arts, Humanities, Management & Science

JANUARY 2023



Chief Editor

**Dr. S. R. Kattimani**

Publisher
**Siddharth Publications (M.S.)**

ISBN : 978-93-5980-212-1

# "Multidisciplinary Approach towards Indian Knowledge System"

Recent Trends in

**Arts, Humanities, Management & Science**

JANUARY 2023

Chief Editor

Dr. S. R. Kattimani

Publisher

**Sidharth Publications,(M.S.)**

ISBN : 978-93-5980-212-1

| | | | |
|---|---|---|---|
| 29. | Dr. Swapnil Buchde, Dr. D. K. Ghatge | संभाषण कौशल्य : स्वरूप व प्रकार | 197 |
| 30. | Dr. Swanil Buchde, Dr. Eknath Alwekar | साहित्य, समाज आणि संस्कृतीचा अनुबंध | 201 |
| 31. | Dr. Pradip Patil, Dr. Eknath Alwekar | साहित्य आणि समाज | 205 |
| 32. | Dr. Umesh D. Dabade, Dr. Sunny Kale | "Investment pattern of investors in Mutual Funds: A Case Study of Aditya Birla Sun Life" | 210 |
| 33. | Dr. D. V. Patil, Dr. G. S. Ubale | A Comprehensive Analysis of Urbanization's Geographic Patterns and Environmental Impacts | 217 |
| 34. | T.U. Urunkar1*, A. V. Shinde1, N. A. Narewadikar1, M.V.Takale2 | Effect of Self-focusing and Diffraction Length on Propagation of Gaussian Laser Beam in Non-Degenerate Germanium having Space Charge Neutrality. | 222 |
| 35. | Dr. Ekanath Alwekar, Dr. Pradip Patil | १९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीतील बदलते वास्तव | 225 |
| 36. | Anjor Jadhav | Antimicrobial activity of aq. and alcoholic extract of Terminalia catappa L. drug resistant bacteria isolated from a clinical sample causing Urinary Tract Infection (UTI) | 229 |
| 37. | *Dr Sunil Bhosale **Dr Govardhan Ubale ***Dr. Sidharth Ghoderao | Hierarchical Distribution Of Towns In Kolhapur District | 250 |
| 38. | Dr. Siddharth S Ghoderao 1, Dr Subhash D Kamble 2 Dr. Govardhan S Ubale 3 Dr. Sunil G Bhosle 4 | Identification Of Land Use Land Cover And Change Detection Analysis Of Case Study Shirol Tehsil In Kolhapur District Using Gis And Remote Sensing Techniques | 255 |
| 39. | Ms. Sai Patil, Dr. Urmila Khot | भरडधान्य आरोग्यदायी अन्न | 258 |
| 40. | Mr. Sunny. S. Kale, Dr. Umesh Dabade | Tax Planning Analysis: Overview | 262 |
| 41. | Dr. S. R. Kattimani | कोरोना नंतरच्या शेअर माकेटमधील आर्थिक गुंतवणूकीबाबतचे विचारमंथन | 267 |
| 42. | Mr. H. V. Chame | जाती संस्थेतील परिवततन एक समाजशास्त्रीय अभ्यास | 272 |

# साहित्य आणि समाज

**प्रा. डॉ. प्रदीप पाटील, डॉ. एकनाथ आळवेकर**
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

**घोषवारा**

साहित्यनिर्मितीमधील आणि साहित्यव्यवहारामधील समाज हा अत्यंत महत्त्वाचा आणि अचल असा घटक असतो. त्या त्या काळातील समाज जसा असतो, त्याप्रमाणे त्या काळातील साहित्य आणि साहित्यव्यवहार हा त्यानुरूप आकार धारण करीत असतो. समाजाचा आणि सामाजिकतेचा विचार केल्याशिवाय साहित्यनिर्मितीचा आणि साहित्यव्यवहाराचा अर्थ कळतच नाही. साहित्यकतीतून आविष्कृत झालेला अनुभव हा कुठल्यातरी समाजातीलच असतो. समाजाशिवाय अनुभव नावाचा घटक अशक्यच असतो. लेखकाची जडणघडण ही समाजातच झालेली असते. त्याची मूल्यदृष्टीही त्याच समाजात आणि त्या समाजाच्या परिप्रेक्षात विकसित झालेली असते.

**सांकल्पनिक संज्ञा**

नवनिर्मिती, साहित्यव्यवहार, अनुबंध, अंत:स्वर, सामाजिक संवेदना, सांस्कृतिक पोषण, भग्नता, रूक्षता, अनोन्य, परिशिलन.

---

**प्रास्ताविक**

समाज जीवनाचे, समाज मनाचे प्रतिबिंब साहित्यात उमटलेले असते. किंबहुना साहित्य हा त्यांचा आरसा असतो. अर्थात त्यातून समाजाचा चेहरा दिसणे स्वाभाविक आहे. साहित्य प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे समाजावर काही संस्कार करीत असते. कधी ते ऐकीव स्वरूपाचे, मौखिक स्वरूपाचे असेल. अगदी माणसाच्या बालवयापासून हे घडत असते. मग हे साहित्य धार्मिक, सामाजिक, राजकीय, वैचारिक स्वरूपाचे असू शकते. म्हणजेच साहित्य आणि समाज हे एक अद्वैत असेच आहे. साहित्यामुळे समाज घडतो. पण हे साहित्य समाजाचेच देणे असते, हेही नाकारता येत नाही.

कोणत्याही समाजाचा अनुबंध हा शेवटी समाजाशी असतो. कारण साहित्याचा मुलाधार शेवटी मानवी जीवन आणि त्याचा समाज हाच असतो. समाजजीवनाला वगळून साहित्याची निर्मिती करणे म्हणजे हवेत मनोरे बांधण्यासारखे आहे. कोणतीही चांगली, दर्जेदार साहित्यकृती अशी नुसत्या कल्पनेवर निर्माण करता येत नाही. तर साहित्यकृतीचा गाभा किंवा केंद्र हा माणूस व त्याचे जगणे हाच असतो. साहित्य हे अनेक चौकटी मोडणारे प्रभावी हत्यार आहे. म्हणून साहित्यातून समाजाचा अंत:स्वर उमटला पाहिजे. समाजाचे वैचारिक, मानसिक, सांस्कृतिक पोषण करण्याचे कार्य साहित्यातून होत असते. समाजाचे सर्वांगीण पोषण करणे, सामाजिक संवेदना टिकविण्याचे कार्य साहित्य करीत नसेल तर त्याचे मूल्य शुन्यवत मानले पाहिजे. जीवनातील भग्नता, रूक्षता, भयावहता कमी करून आनंदाचा झरा निर्माण करणे हे जसे साहित्याचे प्रयोजन आहे, तसेच मानवतेच्या उद्धारासाठी सामाजिक चेतना निर्माण करणे हेही कार्य साहित्याने करणे आवश्यक असते.

**उद्देश :**

१. साहित्याचे समाजातले स्थान व व्याप्ती समजून घेणे.

२. साहित्याचे समाजातले कार्याची नोंद घेणे.

३. साहित्याचा समाजावर होणारा परिणाम शोधणे.

४. साहित्याच्या संदर्भात उद्भवणारे नैतिकतेचे प्रश्न, लेखकाची जबाबदारी, आविष्कार स्वातंत्र्य नियमित करण्याची समाजाची यंत्रणा समजून घेणे.

**संशोधन पद्धती :**

सदर संशोधनासाठी समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

**साहित्य आणि समाज : परस्परसंबंध**

साहित्य आणि संस्कृती यांचा अनोन्य संबंध असून साहित्य हा एक मानवी मन, बुध्दीचा व पर्यायाने समाजाचा, संस्कृतीचा आविष्कार आहे, असे द. का. संत म्हणतात. साहित्याचे मूल्य समाजातील एक सर्जनशील कृती आणि एक स्वतंत्र कलानिर्मिती असे दुहेरी असते. एक सर्जनशील कृती म्हणून साहित्याचा विचार करताना केवळ वाङ्मयीन संदर्भात विचार करून चालत नाही, तर ती कलाकृती ज्या समाजात घडली त्याचा विचारही अपरिहार्य ठरतो. साहित्य हे समाजजीवनाचे अंग असून समाजजीवनाच्या विविध अंगाचे दर्शन साहित्यातून होत असते. साहित्य हे समाजातून निर्माण होते. ते जीवनावर भाष्य करते. जीवनाला समृध्दी आणते. म्हणून समाजजीवनाच्या अभ्यासासाठी साहित्य आणि साहित्याच्या अभ्यासाच्या संदर्भात समाजजीवन महत्त्वाचे ठरते.

साहित्य आणि समाज यांच्यातील परस्परसंबंधाचे स्पष्टीकरण करताना तेन म्हणतो की, ''कोणतीही साहित्यकृती घेतली तरी ती केवळ कल्पनांचा खेळ किंवा उद्दिपीत मेंदूतून निघालेली एक क्षणिक लहर असत नाही. ती लिहिणारा साहित्यिक ज्या समाजात वावरतो, त्या समाजाचा, त्याच्या देशाचा, त्या देशाच्या इतिहास, भूगोल, संस्कृतीचा, तो लेखक ज्या काळात जगला, त्या काळातील गुणधर्माचा एकसमयावच्छदेकरून त्याच्या कृतीवर परिणाम होत असतो. आणि या सर्व घटकांचे परिशिलन केल्यानंतरच त्या कलाकृतीचे सम्यक् दर्शन होऊ शकते.'' म्हणजेच साहित्यकृतीच्या मागे जो लेखक आहे, त्याचा शोध त्या कलाकृतीवरून घेता येतो. साहित्यकृती ही एक दृश्य वस्तू आहे. तिच्या मागील अदृश्य लेखकमनाचा मागोवा त्या कृतीवरून आपण घेऊ शकतो. साहित्यकृतीच्या मांडणीवरून, व्यवस्थापनावरून त्या त्या समाजाच्या मनाचा आपल्याला बोध होत असतो.

साहित्य आणि समाज यांच्यातील परस्पर संबंधाचा अभ्यास करताना भालचंद्र नेमाडे यांनी प्रामुख्याने पुढील बाबींचा उल्लेख केला आहे.

१. साहित्याचे समाजातले स्थान व व्याप्ती.

२. साहित्याचे समाजातले कार्य.

३. साहित्याचा समाजावर होणारा परिणाम.

४. साहित्याच्या संदर्भात उद्भवणारे नैतिकतेचे प्रश्न, लेखकाची जबाबदारी, आविष्कार स्वातंत्र्य नियमित करण्याची

समाजाची यंत्रणा.

५. वाचकांची अभिरूची.

६. साहित्य हे सामाजिकतेचा दस्ताऐवज म्हणून कसे अभ्यासावे, याचा शास्त्रीय पध्दती, सर्वेक्षण, समूहमानस साहित्यकृतीद्वारे मांडण्याच्या पध्दती व तंत्र.

म्हणजेच समाजाचा साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण, लेखकाला दिलेल्या स्वातंत्र्याच्या मर्यादा, त्याला दिलेला प्रतिसाद, मान्यता, लेखकाची परात्मता, आश्रयव्यवस्था, बौध्दिक मालमत्तेच्या संकल्पना आणि कायदे ह्या विषयाचे संदर्भ साहित्य आणि समाज यांच्यातील परस्पर संबंध उलगडण्यासाठी आवश्यक असतात.

साहित्य हा समाजसापेक्ष व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार असतो. साहित्यात लेखकाच्या आत्मनिष्ठेस, जीवनदृष्टीस व भावनात्मक प्रतिक्रियांना महत्त्व असल्याने प्रत्येक साहित्यकृती अनन्यसाधारण बनत असते. लेखकाची आत्मनिष्ठा जितकी निरामय, उत्कट व अविचल तितके त्याचे साहित्य जिवंत व परिणामकारक होते. साहित्याची निर्मिती व्यक्ती करीत असते पण त्याचे वाचन, विश्लेषण, मूल्यमापन समाज करीत असतो.

साहित्य आणि समाज यांच्यातील परस्पर संबंधाचा अनुबंध स्पष्ट करताना डॉ. विलास पाटील म्हणतात, ‘‘साहित्याच्या निर्मितीमागील व्यक्तिमन सामाजिक घटकाशी अभिमुख असते. परंतु साहित्यातील सामाजिकता व्यक्तिमनाची असते व ती अपरिहार्य असते. साहित्याचे परिणामक्षेत्र समाज असतो.’’ या अर्थाने निर्माण झालेले साहित्य हे एकाचवेळी ते व्यक्तिनिष्ठ व समाजनिष्ठ असते.

यावरून साहित्य आणि समाज यांच्यातील परस्पर संबंधाचे स्वरूप लक्षात येते. लेखक हा समाजाचा घटक असतो. परिणामी त्याचे साहित्यही सामाजिक पर्यावरणाचे क्रिया, प्रतिक्रियात्मक फलित असते. साहित्य हे वैयक्तिक असून ते सामाजिक बनते, असे मला वाटते.

**साहित्य आणि सामाजिक परिस्थिती**

साहित्य हे सामाजिक परिस्थितीचे अपत्य मानले जाते. साहित्यनिर्मितीची पाळेमुळे समाजात रूजलेली असतात. तसेच साहित्यिकाची जडणघडण होण्यास तत्कालीन सामाजिक परिस्थिती, विचारप्रणाली, त्या विशिष्ट भाषेतील वाङ्मयीन व शैलीविषयक परंपरा इत्यादी घटक कारणीभूत असतात. साहित्य आणि सामाजिक परिस्थिती यांच्यातील संबंधाचे विवेचन करताना अंजली सोमण म्हणतात, "साहित्यकृती ही प्रतिभेची निर्मिती असते आणि स्वत:ची वैशिष्ट्ये पूर्णत: ती जपत असते, हे खरे आहे. पण त्याचवेळी ज्या काळात व ज्या परिस्थितीत ती निर्माण होते, त्या परिस्थितीचा प्रभाव व मर्यादा पूर्णपणे ओलांडू शकत नाही, हे मान्यच करावे लागते." प्रतिभावंत साहित्यिक कुठे आणि केव्हा निर्माण होतात हे सांगता येत नसले व प्रतिभेच्या व्यापारात काही गूढता असली तरी एकदा कलाकृती निर्माण झाली की, तिच्यावर त्या काळाचा व परिस्थितीचा स्पष्ट, अस्पष्ट असा ठसा उमटलेलाच असतो.

कोणत्याही काळातील कलाकृती घेतल्यास तिच्यामध्ये निर्मात्याची प्रकृती, त्या काळात त्या निर्मितीक्षेत्रात पूर्वसूरींचे सिध्द झालेले कर्तृत्व, निर्मितीपरंपरा, तत्कालीन शैलीविशेष, निर्मात्याच्या मनात विशिष्ट निर्मितीच्या अनुषंगाने चाललेली व्यक्तिगत व कालसापेक्ष आंदोलने, उद्भवलेले कल्पनातरंग, नवनिर्मितीविषयीच्या त्याच्या उत्साहाची प्रत इत्यादीचा अंतर्भाव झालेला दिसतो.

साहित्य हे आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक स्थित्यंतरापासून दूर राहू शकत नाही. या क्षेत्रातील बदलाचा परिणाम साहित्याचा आशय, अभिव्यक्ती व आकृतीबंधावर होत असतो. विशिष्ट सामाजिक परिस्थितीत काहीवेळा नवे आकृतीबंध रूढ होत असतात.

मराठी साहित्याच्या इतिहासाचे विहंगावलोकन केल्यास संत काळातील धार्मिक आंदोलन, एकनाथकालीन भाषिक संघर्ष, रामदासकालीन राजकीय चळवळ, १९ व्या शतकातील सामाजिक सुधारणावादाचे आंदोलन, २० व्या शतकातील राजकीय आंदोलन, महात्मा गांधीनी प्रेरित केलेली ग्रामोध्दाराची चळवळ, साम्यवादाच्या प्रभावाने निर्माण झालेली कामगार चळवळ, संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन, १९६० नंतर उदयास आलेल्या दलित, ग्रामीण, आदिवासी, सांस्कृतिक चळवळी या आंदोलनांचा मराठी साहित्याची भाषा, साहित्याचा आशय आणि अभिव्यक्तिवर परिणाम झालेला दिसतो. एकूणच साहित्याच्या निर्मितीमध्ये त्या त्या काळाचा आणि तेथील सामाजिक परिस्थितीचा संदर्भ येत असल्याचे दिसते.

साहित्य आणि सामाजिक परिस्थिती यावर भाष्य करताना सयाजीराव गायकवाड यांनी साहित्यावर समकालीन परिस्थितीचा प्रभाव असतो, हे उदाहरणाने दर्शविले आहे. तर वि. दा. सावरकरांनी साहित्य हे जीवनाचे एक उपांग असून समाजजीवनाचे चित्रण साहित्यातून यायला हवे, असे म्हटले आहे.

अशाप्रकारे साहित्यावर समकालीन सामाजिक परिस्थितीचा ठसा उमटत असतो. समकालीन परिस्थितीच्या संसर्गाने, संपर्काने साहित्याचे विषय, आशय, शब्दसमूह, अभिव्यक्ती यावर परिणाम होत असतो. समकालीन सामाजिक परिस्थितीतून लेखकाच्या जाणिवा विकसित होत असतात. साहित्याचा व सामाजिक परिस्थितीचा संबंध हा दृढ असतो. या संबंधाचे अस्तित्व स्वीकारावेच लागते.

साहित्य ही एक सामाजिक संस्था आहे. ती समाजाने निर्माण केलेल्या भाषेला आपले माध्यम म्हणून वापरत असते. साहित्यात आलेली प्रतिमा, प्रतिके, छंद ही वाङ्मयीन तंत्रे सामाजिकच असतात. ते समाजातच निर्माण होणारे संकेत आणि मानदंडच आहेत. साहित्य हे समाजाचे पर्यायाने समाजजीवनाचे प्रतिनिधित्वच करत असते. तसेच साहित्य हे एक सामाजिक कार्य आहे. साहित्य ही समाजाची एक अभिव्यक्ती असते. साहित्य कोणत्याही एका काळाचे, सामाजिक परिस्थितीचे अचूक दर्शन घडवित असते. सामाजिक वास्तवाचा कोणतातरी पैलू उलगडून दाखविण्याचे काम साहित्य करीत असते.

साहित्य आणि समाज यांच्यातील अनुबंध उलगडण्यासाठी विशिष्ट काळातच विशिष्ट साहित्यप्रकार का निर्माण झाला? लेखकाच्या भावविश्वाची व्याप्ती मर्यादित राहण्याची कारणे कोणती? सामाजिकता लेखकाचे मनोविश्व नियंत्रित करते का? नियंत्रणाचे स्वरूप काय होते? लेखकाची भाषा आणि समाज यांचा काय आणि कोणता संबंध आहे? एखादा साहित्यप्रकारच एखादया लेखकाला का जवळचा वाटतो? यासारखे प्रश्न उपस्थित होणे गरजेचे आहे. या प्रश्नांच्या माध्यमातून साहित्याकडे आणि साहित्य व्यवहाराकडे पाहिले असता साहित्य आणि समाज यांच्यातील अनुबंध स्पष्ट होईल. असे असले तरी गेल्या हजार वर्षाच्या साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास करणाऱ्यांची संख्या फारशी असलेली दिसत नाही.

**निष्कर्ष**

१. समाजजीवनाचे, समाजमनाचे प्रतिबिंब साहित्यात उमटलेले असते.

२. साहित्यात आलेली प्रतिमा, प्रतिके, छंद ही वाङ्मयीन तंत्रे सामाजिकच असतात.

३. साहित्य हे समाजाचे पर्यायाने समाजजीवनाचे प्रतिनिधित्वच करत असते.

४. साहित्यावर समकालीन सामाजिक परिस्थितीचा ठसा उमटत असतो.

५. समकालीन परिस्थितीच्या संसर्गाने, संपर्काने साहित्याचे विषय, आशय, शब्दसमूह, अभिव्यक्ती यावर परिणाम होत असतो.

**संदर्भ ग्रंथसूची**


१. दु. का. संत - 'साहित्य आणि संस्कृती, रत्नागिरी, १९५०.

२. भालचंद्र नेमाडे - 'साहित्याचे समाजशास्त्र, प्रतिमा प्रकाशन, २००७.

३. डॉ. विलास पाटील - 'वाङ्मयधारा, झुंझार प्रकाशन, २००५.

४. हरिश्चंद्र थोरात - 'साहित्याचे सामाजिक संदर्भ, शब्दालय प्रकाशन, २००४.

५. नागनाथ कोत्तापले - 'साहित्य आणि समाज, प्रतिमा प्रकाशन, २००७.